# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १०७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०२/२०१७

**१) प्रेमसंबधाचे वादावरुन चाकुने छातीवर व पाठीवर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २२/०२/२०१७ चे २३.१५ वा. दरम्यान. यातील फिर्यादी प्रतीक्षा रमन मेश्राम वय १७ वर्ष, रा. इंदीरा गांधी वार्ड दास लेआऊट दास रोड भंडारा जखमी हिचे गळयाचे मानेवर व तिचे आई वडील घरी हजर असतांनी आरोपी याने घरासमोर जावुन प्रेमसंबधाचे वादावरुन आरडाओरड करुन शिवीगाळ केली व फिर्यादीचे वडील हे घराचे बाहेर अंगनात आले असता त्यांना धारदार चाकुने छातीवर मारुन जखमी केले फिर्यादीची आई वाचविण्यास धावली असता तिला सुध्दा चाकुने पाठीवर मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२६,३२३,५०६,५०४ भादंवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) शेतातुन इलेक्ट्रीक मोटार पंपची चोरी . :–**

दिनांक १०/०२/२०१७ चे रात्र दरम्यान ते ११/०२/२०१७ पर्यत. यातील फिर्यादी अर्जन मोना कोंटागले वय ८६ रा. विहीरगाव त्याचे शेतात असलेल्या विहीरीवर सीआयआर कंपनीची १.५ एचपीची इलेक्ट्रीक मोटार पंप किंमती ७,०००/–रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**३) बिना पास परवाना रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक १३/०२/२०१७ चे १७.३५ वा. दर. यातील फिर्यादी सुरेश श्रीराम मेश्राम वय ३५ वर्ष, रा. भंडारा हा लोकसेवक असुन यातील आरोपी ट्रॅक्टर चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टरच्या ट्रॉली मध्ये ०१ ब्रास रेती किंमती २,०००/–रु. चा माल बिना पास परवाना रॉयल्टी शिवाय वाहतुक करतांनी मिळुन आल्याने ट्रॅक्टर चालकाने २ व्यक्तींना फोन करुन घटनास्थळी बोलवीले. व रेतीने भरलेला ट्रॅक्टर चालकाने व मालकाने ट्रॅक्टर पळवुन घेवुन गेले असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पो. स्टे. वरठी येथे कलम ३७९,३४ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. श्रीरामे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १३/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती ०४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ९०४९००३३७२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.